D:\2013-18\प्रशासक कार्यकाळ\सभा कामकाज\महासभा ठराव


# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.२९** **(विशेष महासभा)**

**विषय क्र.:- ०१** **प्रशासक ठराव क्र.:-१९७** **दिनांक :-११/१०/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. दि.०७/१०/२०२४ सोमवार रोजी सायंकाळी- ५.३० वाजता संपन्न झालेल्या सभा क्र.२८ चे कार्यवृत्त कायम करणे.

**विषय :-** दि.०७/१०/२०२४ सोमवार रोजी सायंकाळी- ५.३० वाजता संपन्न झालेल्या सभा क्र.२८ चे कार्यवृत्त कायम करणे.

---

वाचा क्र.१ व २ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

दि.०७/१०/२०२४ सोमवार रोजी सायंकाळी- ५.३० वाजता संपन्न झालेल्या सभा क्र.२८ चे कार्यवृत्त कायम करणेस मंजूरी देण्यात येत आहे.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.२९** **(विशेष महासभा)**

**विषय क्र.:- ०२** **प्रशासक ठराव क्र.:-१९८** **दिनांक :-११/१०/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचेकडिल जा.क्रं./बांधकाम/१३८४/२०२४-२५ दि.०९/१०/२०२४

**विषय :-** जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजने अंतर्गत शहरातील विकास कामांना मान्यता देणे बाबत.

वाचा क्र.१ व शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचा वाचा क्र. २ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

सहाय्यक आयुक्त, न.वि.शाखा,जिल्हाधिकारी कार्यालय,जळगांव यांचे कडील पत्र क्रं.जा.क्रं./न.वि.शाखा/न.पा-१/४५२/२०२४ दि.१६/०७/२०२४ अन्वये निधी अनुज्ञेय आदेशानुसार जिल्हा वार्षीक योजने अंतर्गत सन २०२४-२५ या आर्थीक वर्षाकरिता महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजने अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिके करीता रक्कम रु.७,५३,५७,६००/- मात्रचा निधी मनपास अनुज्ञेय करण्यात आल्यानुसार सहा.आयुक्त, न.वि.शाखा,जिल्हाधिकारी कार्यालय,जळगांव यांचे कडील पत्र क्रं.जा.क्रं./न.वि.शाखा/न.पा-१/७०६/२०२४ दि.०८/१०/२०२४ च्या पत्रानुसार महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजने अंतर्गत खाली नमुद कामांचे अंदाजपत्रक रक्कम रु.१,५४,७८,९९६/- मात्रचे साबा विभाग राज्यदर सुची सन २०२३-२४ नुसार तयार करण्यात आलेले आहे. सदर अंदाजपत्रकास शहर अभियंता यांनी खालील कामांना तांत्रिक मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

त्यानुसार खालील कामांच्या अंदाजपत्रकांना मान्यता होण्याकरीता महासभेची मान्यता आवश्यक असल्याने महासभा/प्रशासक यांची मान्यता होवुन तातडीने प्रशासकीय ठराव होण्याकरीता प्रस्ताव सादर केलेला आहे.

| अ.क्रं. | कामाचे नांव | तांत्रिक मान्यता जशमनपा पत्र क्रं. व दिनांक | तांत्रिक मान्यता रक्कम |
|---|---|---|---|
| १. | प्रभाग क्र.११ अंतर्गत पिंप्राळा शिवार गट नं.१५२/०१ मध्ये रस्ते डांबरीकरण करणे. | TS/PWD/१८६ दि.०४/१०/२०२४ | २५,४७,७०६/- |
| २. | प्रभाग क्र.११ अंतर्गत पिंप्राळा शिवार गट नं.९५/०१ मध्ये मारोती मंदिरापासुन ते भिलाटी सार्व.शौचालय पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | TS/PWD/१८९ दि.०४/१०/२०२४ | ५३,९३,९८४/- |
| ३. | प्रभाग क्र.११ अंतर्गत पिंप्राळा शिवार गट नं.१५३ मध्ये रस्ते डांबरीकरण करणे. | TS/PWD/१८८ दि.०४/१०/२०२४ | २५,९४,२५८/- |
| ४. | प्रभाग क्र.११ अंतर्गत विद्युत कॉलनी, कोल्हे नगर, यशवंत नगर, शास्त्री नगर, जिवन नगर, भुषण कॉलनी, भगवान नगर मध्ये आर सी सी गटार व स्लॅब कल्व्हर्ट बांधणे. | TS/PWD/१८७ दि.०४/१०/२०२४ | ४९,४३,०४८/- |

वरील कामास प्रशासकीय मान्यतेची आवश्यकता असल्याने प्रशासकीय मान्यता मिळण्याकरीता व तसा ठराव प्राप्त झाल्यानंतर मा.जिल्हाधिकारी,जळगांव यांचे कडेस वरील कामांचा प्रस्ताव सादर करणेस मान्यता मिळण्यासाठी शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ व २ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.२९** **(विशेष महासभा)**

**विषय क्र.:- ०३** **प्रशासक ठराव क्र :-१९९** **दिनांक :-११/१०/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. सहाय्यक संचालक, नगररचना, नगररचना विभाग यांचेकडील प्रस्ताव जा.क्र./न.र./८४६/२०२४-२५ दि.१०/१०/२०२४

**विषय :-** जळगांव शहराच्या मंजुर विकास योजना (वाढीव हद्द) मधील मौजे खेडी बु. गट क्र.३५ व ३६/१अ या जमिनीतुन दर्शविलेल्या १२ मी. विकास योजना रस्त्याने बाधीत जमिनीच्या भुसंपादनाबाबत.

---

वाचा क्र.१ व सहाय्यक संचालक, नगररचना, नगररचना विभाग यांचा वाचा क्र. २ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

१)अर्जदार श्री.अतुल अशोक मुंदडा व इतर यांचेकडील दि.१४/०२/२०२४ रोजीची महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ नुसार प्राप्त नोटीस नगररचना कार्यालयाकडील आवक क्रं.३२६३ दि.२१/०२/२०२४, २)विकास योजना रस्त्याने बाधीत क्षेत्र मोबदला हस्तांतरणीय विकास हक्क स्वरुपात देणेबाबत नगररचना कार्यालयाकडील पत्र जावक क्र.नर/१५२ दि.०८/०५/२०२४, व ३)अर्जदार श्री.अतुल अशोक मुंदडा यांचे कडील दि.१४/०५/२०२४ रोजीचे पत्र नगररचना कार्यालयाकडील आवक क्रं.३५२ दि.१६/०५/२०२४ नगररचना विभागाकडेस प्राप्त असुन संबंधीत अर्जदार यांनी जळगांव शहराच्या मंजुर विकास योजना (वाढीव हद्द) मधील मौजे खेडी बु. गट क्र.३५ व ३६/१अ या जमिनीतुन दर्शविलेल्या १२ मी. विकास योजना रस्त्याने बाधीत जमिनीच्या भुसंपादनाबाबत विनंती केलेली आहे.

जळगांव शहराकरीता शासनाने अधिसुचना क्रं.टी.पी.एस. ३५९९/७३८/सि.आर.१४२ (ए) युडी-९ दि.११/०१/२००२ पासुन अंमलात आलेली आहे. तसेच उर्वरीत वगळलेल्या भागाची विकास योजना (इ.पी.) शासनाने अधिसुचना क्र.टी.पी.एस.३५०३/४९३/सि.आर.१०२ (ए) ०३/युडी-९ दि.१०/०८/२००४ मंजुर केलेली असुन उक्त योजना दि.०१/१०/२००४ पासुन अंमलात आलेली आहे.

उक्त मंजुर विकास योजनेतील अर्जदार यांचया मालकीची मौजे खेडी गट क्रं.३५ पै. व ३६ पै. ही जागा १२ मी. रुंद विकास योजना रस्त्याच्या आरक्षणाने प्रस्तावित आहे. उपरोक्त विकास योजना रस्त्याच्या भुसंपादनासंबंधी अर्जदार यांनी अर्जदार श्री.अतुल अशोक मुंदडा व इतर यांचेकडील दि.१४/०२/२०२४ रोजीची महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ नुसार प्राप्त नोटीस नगररचना कार्यालयाकडील आवक क्रं.३२६३ दि.२१/०२/२०२४ नुसार नोटीस दिलेली असुन विकास योजना रस्त्याने बाधीत क्षेत्र मोबदला हस्तांतरणीय विकास हक्क स्वरुपात देणेबाबत नगररचना कार्यालयाकडील पत्र जावक क्र.नर/१५२ दि.०८/०५/२०२४ नुसार अर्जदार यांस विकास योजना रस्त्याने बाधीत क्षेत्र मोबदला हस्तांतरणीय विकास हक्क स्वरुपात देणेबाबत कळविले असता अर्जदार श्री.अतुल अशोक मुंदडा यांचे कडील दि.१४/०५/२०२४ रोजीचे पत्र नगररचना कार्यालयाकडील आवक क्रं.३५२ दि.१६/०५/२०२४ नुसार अर्जदार यांनी रस्त्यासाठी आरक्षीत क्षेत्राबाबत टी.डी.आर. किंवा इतर कोणताही पर्याय नाकारुन संपादनाव्दारे मोबदला अपेक्षीलेला आहे.

अर्जदार यांनी अर्जात नमुद केलेल्या माहितीनुसार चित्रशाखा, नगररचना विभाग यांचे मार्फत रेखाटन केले असता उपरोक्त १२ मी. रुंद विकास योजना रस्ता चित्रशाखेकडील उपलब्ध नकाशानुसार अर्जदार यांच्या मालकीच्या फक्त गट नं.३५ मधुन जात असुन प्रथमदर्शनी गट क्रं.३६/१ अ मधुन जात नसल्याचे दिसुन येते. तथापि, विकास योजनेच्या नकाशात दर्शविण्यात आलेला विकास योजना रस्ता व प्रत्यक्ष जागेवरील रस्त्याने संरेखन यामध्ये किरकोळ

बदल असल्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी सदर रस्त्याच्या गट क्रं.३६ मधील संरेखनाबाबत प्रत्यक्ष संयुक्त मोजणीवेळी स्पष्टीकरण होणार असल्याने आज रोजी भुसंपादन प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी सादर या कामी सन २०२४-२५ च्या शिघ्रसिध्दगणकामधील दरानुसार विषयांकीत जमिनीच्या अदमासे बाधीत क्षेत्रफळाकरीता अंदाजित भुसंपादनाकरीताच्या खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे

| प्रयोजन | शिवार | स.क्र. | अंदमासे भुसंपादन क्षेत्रफळ (चौ.मी.) | शि.सि.गणकानुसार दर (प्रति चौ.मी) | अंदाजीत खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १२ मी.रुंद विकास योजना रस्ता | खेडी | ३५ | १८४० | २४५०.०० (२०२४-२५, ४/१६१) | रु.४५,०८,०००/- |
| १२ मी.रुंद विकास योजना रस्ता | खेडी | ३६/१अ | ८४० | ३४८०.०० (२०२४-२५, ४/१६०) | रु.२९,२३,२००/- |
| | | | | एकुण रक्कम | रु.७४,३१,२००/- |
| | | | भुसंपादनाकरीता आवश्यक अंदाजित खर्च | X २ | रु.१,४८,६२,४००/- |

उपरोक्त भुसंपादन प्रकरणी रक्कम रू१,४८,६२,४००/- खर्च अपेक्षीत असुन त्याचप्रमाणे संयुक्त मोजणीसाठी येणारा खर्च, प्रस्तावातंर्गत वेळोवेळी येणाऱ्या खर्चास व प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी तथा भुसंपादन अधिकारी,जळगांव यांचेकडेस पाठविणेकामी मान्यता मिळणेबाबत सहाय्यक संचालक, नगररचना, नगररचना विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

जळगांव शहर महानगरपालिकेची आर्थिक स्थिती लक्षात घेता प्रस्तावातील खर्चास मंजूरी देणे योग्य होणार नाही. जमिन मालक यांना टि.डी.आर. घेणे संदर्भात प्रोत्साहीत करण्यात यावे अथवा त्यांना UDCPR नियमाअंतर्गत Reservation Accomondation याबाबत सुध्दा विचारणा करण्यात यावी. याप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात येत आहे.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.२९** **(विशेष महासभा)**

---

**विषय क्र.:- ०४** **प्रशासक ठराव क्र :-२००** **दिनांक :-११/१०/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. प्रकल्प अभियंता, प्रकल्प विभाग यांचेकडील प्रस्ताव जा.क्र./जमनपा/प्रकल्प/१००/२०२४ दि.१०/१०/२०२४
३. प्रकल्प अभियंता, प्रकल्प विभाग यांचा दि.०९/१०/२०२४ चा अभिप्राय
४. शहर अभियंता यांचा दि.१०/१०/२०२४ चा अभिप्राय
५. मुख्य लेखापरिक्षक यांचा दि.१०/१०/२०२४ चा अभिप्राय
६. आयुक्त यांचा दि.१०/१०/२०२४ चा अभिप्राय

**विषय :-** जळगांव महानगरपालिकेच्या अमृत २.० योजने अंतर्गत मलनिस्सारण योजनेच्या झोन क्र.२ (खेडीनाला) झोन क्रं.०५ पिंप्राळा नाला कामांच्या सविस्तर प्रकल्प अहवालास सुधारीत प्रशासकीय मान्यता व निधी उभारणेस मान्यता मिळणेबाबत.

---

वाचा क्र. १ व प्रकल्प अभियंता, प्रकल्प विभाग, मनपा जळगांव यांचा वाचा क्र. 2 ते ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

अमृत २.० योजने अंतर्गत जळगाव महानगरपालिकेच्या मलनिस्सारण योजनेच्या झोन क्र. २ (खेडी नाला) झोन क्रं.०५ पिंप्राळा नाला कामांच्या च्या सविस्तर प्रकल्प अहवालानुसार खर्चास महासभा ठराव क्रं.१२२ दि.१९.०७.२०२३ व महासभा ठराव क्रं.१२० दि.१९.०७.२०२३ अन्वये महासभने यापूर्वीच प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

महानगरपालिकेने मलनिस्सारण योजनेतून प्रक्रिया केलेले पाणी औष्णीक विदुयत केंद्रासाठी पुर्नवापर करणेबाबत शासन निर्णय दि.३०.११.२०१७ च्या धोरणानुसार महासभा ठराव क्रं.१३३ दि.१९.०७.२०२४ अन्वये महानगरपालिकेने मान्यता दिलेली आहे.

सदर कामी महाराष्ट्र राज्य विज उत्पादक कंपनी लि. यांनी दिलेल्या कराराच्या मसुदयानुसार करावयाच्या Wet well and pump house, pumping machinary, Rising main, common sewerage treatment plant for ०३ Zones, etc ही कामे तात्काळ पुर्ण करून पाण्याचा पुनर्वापर सुरू करणेच्या उद्देशाने कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून महाराष्ट्र राज्य विज उत्पादक कंपनी लि. मार्फत करण्याची व याकामांसाठी महानगरपालिकेच्या स्वहिस्याची रक्कम त्यांचे मार्फत उभारण्याची तयारी दर्शविल्याने महानगरपालिकेने या अनुशंगाने नगरविकास विभागास प्रस्ताव सादर केलेला होता. सदर कामी अमृत अभियाना अंतर्गत गठीत राज्य स्तरीय तांत्रिक समितीने दि.०३.०९.२०२४ रोजी घेतलेल्या बैठकीत "*सदयस्थितीत सदर प्रकल्पांना केंद्र शासन स्तरावरील शिखर समितीची मान्यता आहे, त्यामध्ये कुठलाही बदल करावयाचा असल्यास राज्यस्तरीय उच्चाधिकार सुकाणू समितीच्या मान्यतेने केंद्र शासनाच्या शिखर समितीची मान्यता आवश्यक आहे. तसेच यामध्ये बदल न करता महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्या. च्या प्रस्तावाप्रमाणे एकाच प्रकल्पासाठी दोन वेगवेगळ्या कार्यान्वयन यंत्रणा (मलनिःसारण केंद्र व तदनुषंगिक घटकांसाठी महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्या. आणि उर्वरित करिता जळगाव महानगरपालिका) नेमणे तांत्रिक दृष्ट्या शक्य नाही. या बाबी विचारात घेता, सद्यस्थितीत जळगाव महानगरपालिकेने कार्यान्वयन यंत्रणा म्हणून काम करावे व महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्या. ने शक्य असल्यास प्रस्तावातील कामासाठीचा स्वहीस्सा जळगाव महानगरपालिकेला उपलब्ध करून दयावा असे कळविले आहे*" सदर कामी Wet well and pump house, pumping machinary, Rising main, common sewerage treatment plant for ०३ Zones, etc कामांसाठी होणारा रू.५१.७९ कोटी स्वहीस्सा महाराष्ट्र वीज निर्मीती कंपनी मर्या.कडून महानगरपालिकेस दिल्यास प्रकल्पास विलंब होणार नाही त्यामुळे सदर रक्कम महानगरपालिकेस वर्ग करणेच्या अनुषंगाने आपली संमती

कळविण्याबाबत पत्र देवून कळविण्यात आलेले होते. त्यानुसार महाराष्ट्र राज्य विज उत्पादक कंपनी लि. यांनी दि.२०.०९.२०२४ च्या पत्रानुसार ३० टक्के निधी महानगरपालिकेला वर्ग करणे शक्य होणार नसल्याचे कळविले आहे. सदर प्रकरणी शासनाकडेस पत्र देवून पुढील मार्गदर्शन होणेकामी विनंती केली होती. त्यानुसार शासनाने कक्ष अधिकारी, नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कडील पत्र क्रं.अमृत- २०२४/प्र.क्रं.५२१/ नवि-३३ दिनांक ०५.१०.२०२४ अन्वये सदर कामांसाठी दोन स्वतंत्र प्रस्ताव तयार करून शासनाकडेस सादर करण्याच्या सुचना महानगरपालिकेस दिलेल्या आहेत. त्यानुसार महानगरपालिकेने महानगरपालिका पत्र क्रं.जमनपा/प्रकल्प विभाग/९६/२०२४ दि.०७.१०.२०२४ अन्वये तांत्रिक मान्यतेसाठी ०३ स्वतंत्र सुधारीत प्रस्ताव तयार करून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग नाशिक यांना सादर केला होता. त्यनुसार खेडी नाला व पिंप्राळा नाला भागांसाठी रू.३८३,०७,८६,१००/- रकमेच्या सुधारीत प्रस्तावास मुख्य अभियंता, मजीप्रा वि. नाशिक यांचे तांत्रिक मान्यता पत्र क्रं.मजीप्रा/नाशिक/चिशा/२७६/२०२४ दि.०८.१०.२०२४ नुसार मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रादेशिक विभाग नाशिक यांनी तांत्रिक मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सुधारीत प्रस्ताव राज्य स्तरीय तांत्रिक मान्यता समितीकडे दि.०८.१०.२०२४ रोजी सादर करण्यात आलेला आहे.

सुधारीत रकमेच्या खर्चाचा आकृतीबंध खालील प्रमाणे आहे.

| केंद्र शासन | राज्य शासन | महानगरपालिका हिस्सा |
|---|---|---|
| ३३.३३% | ३६.६७% | ३०% |
| **रू.१२७,६८,०१,००८/-** | **रू.१४०,४७,४९,२६३/-** | **रू.११४,९२,३५,८३०/-** |

तरी अमृत २.० अंतर्गत,

१) मलनिस्सारण झोन क्रं.०२ खेडी नाला व झोन क्रं.०५ पिंप्राळा नाला भागांसाठी मलनिस्सारण योजना राबविणेकामी सुधारीत खर्च रू.३८३,०७,८६,१००/- रकमेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे प्रकरण १२ नाल्या व जलनिःसारण मधील कलम १५४ नुसार सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळणेस,

२) महानगरपालिकेच्या स्वहिस्याची रक्कम महासभा ठराव क्रं.८६९ दि.०८.०८.२०२२ मधील निर्देशानुसार उभारणेस,

३) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १७६ (अ) नुसार झोन क्रं.०२ खेडी नाल्यासाठी जळगाव स.नं.५७/३/४ खेडी गट नं. १४/४ मल उपसा केंद्राची जागा व झोन क्रं.०५ पिंप्राळा नाल्यासाठी आव्हाणे शिवार गट नं.६७३ मल उपसा केंद्राची जागा निश्चितीस मान्यता मिळण्यासाठी प्रकल्प अभियंता, प्रकल्प विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र. १ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.२९** **(विशेष महासभा)**

**विषय क्र.:- ०५** **प्रशासक ठराव क्र :-२०१** **दिनांक :-११/१०/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. प्रकल्प अभियंता, प्रकल्प विभाग यांचेकडील प्रस्ताव जा.क्र./जमनपा/प्रकल्प/१०१/२०२४ दि.१०/१०/२०२४
३. प्रकल्प अभियंता, प्रकल्प विभाग यांचा दि.१०/१०/२०२४ चा अभिप्राय
४. शहर अभियंता यांचा दि.१०/१०/२०२४ चा अभिप्राय
५. मुख्य लेखापरिक्षक यांचा दि.१०/१०/२०२४ चा अभिप्राय
६. आयुक्त यांचा दि.१०/१०/२०२४ चा अभिप्राय

**विषय :-** जळगांव महानगरपालिकेच्या अमृत २.० योजने अंतर्गत मलनिस्सारण योजनेच्या झोन क्र.३ (हरीविठ्ठल नाला) च्या सविस्तर प्रकल्प अहवालास सुधारीत प्रशासकीय मान्यता व निधी उभारणेस मान्यता मिळणेबाबत.

---

वाचा क्र.१ व प्रकल्प अभियंता, प्रकल्प विभाग, मनपा जळगांव यांचा वाचा क्र. २ ते ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

अमृत २.० योजने अंतर्गत जळगाव महानगरपालिकेच्या मलनिस्सारण योजनेच्या झोन क्र. ३(हरीविठ्ठल नाला)कामाच्या च्या सविस्तर प्रकल्प अहवालानुसार खर्चास महासभा ठराव क्रं.१२१ दि.१९.०७.२०२ अन्वये महासभने रक्कम रू.४६७,२२,०८,९६३/- च्या कामास यापूर्वीच प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

महानगरपालिकेने मलनिस्सारण योजनेतून प्रक्रिया केलेले पाणी औष्णीक विदुयत केंद्रासाठी पुर्नवापर करणेबाबत शासन निर्णय दि.३०.११.२०१७ च्या धोरणानुसार महासभा ठराव क्रं.१३३ दि.१९.०७.२०२४ अन्वये महानगरपालिकेने मान्यता दिलेली आहे.

सदर कामी महाराष्ट्र राज्य विज उत्पादक कंपनी लि. यांनी दिलेल्या कराराच्या मसुदयानुसार करावयाच्या Wet well and pump house, pumping machinary, Rising main, common sewerage treatment plant for ०३ Zones, etc ही कामे तात्काळ पुर्ण करून पाण्याचा पुनर्वापर सुरू करणेच्या उद्देशाने कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून महाराष्ट्र राज्य विज उत्पादक कंपनी लि. मार्फत करण्याची व याकामांसाठी महानगरपालिकेच्या स्वहिस्याची रक्कम त्यांचे मार्फत उभारण्याची तयारी दर्शविल्याने महानगरपालिकेने या अनुशंगाने नगरविकास विभागास प्रस्ताव सादर केलेला होता. सदर कामी अमृत अभियाना अंतर्गत गठीत राज्य स्तरीय तांत्रिक समितीने दि.०३.०९.२०२४ रोजी घेतलेल्या बैठकीत "*सदयस्थितीत सदर प्रकल्पांना केंद्र शासन स्तरावरील शिखर समितीची मान्यता आहे, त्यामध्ये कुठलाही बदल करावयाचा असल्यास राज्यस्तरीय उच्चाधिकार सुकाणू समितीच्या मान्यतेने केंद्र शासनाच्या शिखर समितीची मान्यता आवश्यक आहे. तसेच यामध्ये बदल न करता महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्या. च्या प्रस्तावाप्रमाणे एकाच प्रकल्पासाठी दोन वेगवेगळ्या कार्यान्वयन यंत्रणा (मलनिःसारण केंद्र व तदनुषंगिक घटकांसाठी महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्या. आणि उर्वरित करिता जळगाव महानगरपालिका) नेमणे तांत्रिक दृष्ट्या शक्य नाही. या बाबी विचारात घेता, सद्यस्थितीत जळगाव महानगरपालिका सदर जळगाव महानगरपालिकेने कार्यान्वियन यंत्रणा म्हणून काम करावे व महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्या. ने शक्य असल्यास प्रस्तावातील कामासाठीचा स्वहीस्सा जळगाव महानगरपालिकेला उपलब्ध करून दयावा असे कळविले आहे*" सदर कामी Wet well and pump house, pumping machinary, Rising main, common sewerage treatment plant for ०३ Zones, etc कामांसाठी होणारा रू.५१.७९ कोटी स्वहीस्सा महाराष्ट्र वीज निर्मीती कंपनी मर्या.कडून महानगरपालिकेस दिल्यास प्रकल्पास विलंब होणार नाही त्यामुळे सदर रक्कम महानगरपालिकेस वर्ग करणेच्या अनुषंगाने आपली संमती कळविण्याबाबत पत्र देवून कळविण्यात आलेले होते. त्यानुसार महाराष्ट्र राज्य विज उत्पादक कंपनी लि. यांनी दि.२०.०९.२०२४ च्या पत्रानुसार ३० टक्के निधी महानगरपालिकेला वर्ग करणे शक्य होणार नसल्याचे कळविले आहे.

सदर प्रकरणी शासनाकडेस पत्र देवून पुढील मार्गदर्शन होणेकामी विनंती केली होती. त्यानुसार शासनाने कक्ष अधिकारी, नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कडील पत्र क्रं.अमृत- २०२४/प्र.क्रं.५२१/नवि-३३ दिनांक ०५.१०.२०२४ अन्वये सदर कामांसाठी दोन स्वतंत्र प्रस्ताव तयार करून शासनाकडेस सादर करण्याच्या सुचना महानगरपालिकेस दिलेल्या आहेत. त्यानुसार महानगरपालिकेने महानगरपालिका पत्र क्रं.जमनपा/प्रकल्प विभाग/९६/२०२४ दि.०७.१०.२०२४ अन्वये तांत्रिक मान्यतेसाठी ०३ स्वतंत्र सुधारीत प्रस्ताव तयार करून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग नाशिक यांना सादर केले होते. त्यनुसार हरीविठ्ठल नाला भागासाठी रू.२९३,२६,६३,१२६/- रकमेच्या सुधारीत प्रस्तावास मुख्य अभियंता, मजीप्रा वि. नाशिक यांचे तांत्रिक मान्यता पत्र .मजीप्रा/नाशिक/चिशा/२७६८/२०२४ दि.०८.१०.२०२४ नुसार मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रादेशिक विभाग नाशिक यांनी तांत्रिक मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सुधारीत प्रस्ताव राज्य स्तरीय तांत्रिक मान्यता समितीकडे दि.०८.१०.२०२४ रोजी सादर करण्यात आलेला आहे.

सुधारीत रकमेच्या खर्चाचा आकृतीबंध खालील प्रमाणे आहे.

| केंद्र शासन | राज्य शासन | महानगरपालिका हिस्सा |
|---|---|---|
| ३३.३३% | ३६.६७% | ३०% |
| **रू.९७,७४,५६,६२०/-** | **रू.१०७,५४,०७,५६८/-** | **रू.८७,९७,९८,९३८/-** |

तरी अमृत २.० अंतर्गत,

१) मलनिस्सारण झोन क्रं.०३ हरीविठ्ठल नाला भागासाठी मलनिस्सारण योजना राबविणेकामी सुधारीत खर्च रू.२९३,२६,६३,१२६/- ला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे प्रकरण १२ नाल्या व जलनिःसारण मधील कलम १५४ नुसार प्रशासकीय मान्यता मिळणेस

२) महानगरपालिकेच्या स्वहिस्याची रक्कम महासभा ठराव क्रं.८६९ दि.०८.०८.२०२२ मधील निर्देशानुसार उभारणेस,

३) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १७६ (अ) नुसार झोन क्रं.०३ हरीविठ्ठल नाला भागासाठी पिंप्राळा गट नं.३३४ मल उपसा केंद्राची जागा निश्चितीस मान्यता मिळण्यासाठी प्रकल्प अभियंता, प्रकल्प विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-

(**ज्ञानेश्वर ढेरे**)

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका**,**जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.२९** **(विशेष महासभा)**

**विषय क्र.:- ०६** **प्रशासक ठराव क्र :-२०२** **दिनांक :-११/१०/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. प्रकल्प अभियंता, प्रकल्प विभाग यांचेकडील प्रस्ताव जा.क्र./जमनपा/प्रकल्प/१०२/२०२४ दि.१०/१०/२०२४
३. प्रकल्प अभियंता, प्रकल्प विभाग यांचा दि.०९/१०/२०२४ चा अभिप्राय
४. शहर अभियंता यांचा दि.१०/१०/२०२४ चा अभिप्राय
५. मुख्य लेखापरिक्षक यांचा दि.१०/१०/२०२४ चा अभिप्राय
६. आयुक्त यांचा दि.१०/१०/२०२४ चा अभिप्राय

**विषय :-** जळगांव महानगरपालिकेच्या अमृत २.० योजने अंतर्गत मलनिस्सारण योजनेच्या झोन क्र.०१ ते ०५ मधील प्रक्रिया केलेले सांडपाणी भुसावळ औष्णीक विदयुत केंद्राच्या गरजेसाठी वापर करणेसाठी करार करणे व झोन क्रं.०२,०३,०५ मधील नाल्यापासून पुढील प्रस्तावित कामे महाराष्ट्र राज्य वीज निर्मीती कंपनी मर्या. यांचे मार्फत कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून करणेस मान्यता मिळणेबाबत.

---

वाचा क्र.१ व प्रकल्प अभियंता, प्रकल्प विभाग, मनपा जळगांव यांचा वाचा क्र. २ ते ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

महाराष्ट्र राज्य वीज निर्मीती कंपनी मर्या. यांचेशी करार शहरातील मलनिस्सारण झोन मधील प्रक्रिया केलेले पाणी औष्णीक विदुयत केंद्रासाठी पुर्नवापर करणेबाबत शासन निर्णय दि.३०.११.२०१७ च्या धोरणानुसार महासभा ठराव क्रं.१३३ दि.१९.०७.२०२४ अन्वये महानगरपालिकेने मान्यता दिलेली आहे.

सदर कामी कराराच्या मसुदयानुसार करावयाच्या पार्ट-(बी) मधील नमूद कामे (Wet well and pump house, pumping machinary, Rising main, common sewerage treatment plant for ०३ Zones, etc) तात्काळ पुर्ण करून पाण्याचा पुनर्वापर सुरू करणेच्या उद्देशाने महाराष्ट्र राज्य विज उत्पादक कंपनी लि. यांचेमार्फत करण्याची प्रस्तावना महानगरपालिकेने महानगरपालिका पत्र क्रं.जमनपा/प्रकल्प विभाग/६९/२०२४ दि.२२.०८.२०२४ अन्वये नगरविकास विभागास केलेली होती. सदर कामी अमृत अभियाना अंतर्गत गठीत राज्य स्तरीय तांत्रिक समितीने दि.०३.०९.२०२४ रोजी घेतलेल्या बैठकीत "*सदयस्थितीत सदर प्रकल्पांना केंद्र शासन स्तरावरील शिखर समितीची मान्यता आहे, त्यामध्ये कुठलाही बदल करावयाचा असल्यास राज्यस्तरीय उच्चाधिकार सुकाणू समितीच्या मान्यतेने केंद्र शासनाच्या शिखर समितीची मान्यता आवश्यक आहे. तसेच यामध्ये बदल न करता महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्या. च्या प्रस्तावाप्रमाणे एकाच प्रकल्पासाठी दोन वेगवेगळ्या कार्यान्वयन यंत्रणा (मलनिःसारण केंद्र व तदनुषंगिक घटकांसाठी महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्या. आणि उर्वरित करिता जळगाव महानगरपालिका) नेमणे तांत्रिक दृष्ट्या शक्य नाही. या बाबी विचारात घेता, सद्यस्थितीत जळगाव महानगरपालिका सदर जळगाव महानगरपालिकेने कार्यान्वयन यंत्रणा म्हणून काम करावे व महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्या.ने शक्य असल्यास प्रस्तावातील कामासाठीचा स्वहीस्सा जळगाव महानगरपालिकेला उपलब्ध करून दयावा असे कळविले आहे*" सदर कामी पार्ट –बी मधील वरील कामांसाठी होणारा खर्चानुसार रू.५१.७९ कोटी स्वहीस्सा महाराष्ट्र वीज निर्मीती कंपनी मर्या.कडून महानगरपालिकेस दिल्यास प्रकल्पास विलंब होणार नाही त्यामुळे सदर रक्कम महानगरपालिकेस वर्ग करणेच्या अनुषंगाने आपली संमती कळविण्याबाबत पत्र देवून कळविण्यात आलेले होते. त्यानुसार महाराष्ट्र राज्य विज उत्पादक कंपनी लि. यांनी दि.२०.०९.२०२४ च्या पत्रानुसार ३० टक्के निधी महानगरपालिकेला वर्ग करणे शक्य होणार नसल्याचे कळविले आहे. सदर प्रकरणी शासनाकडेस पत्र देवून पुढील मार्गदर्शन होणेकामी विनंती केली होती त्यानुसार शासनाने कक्ष अधिकारी, नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कडील पत्र क्रं.अमृत- २०२४/प्र.क्रं.५२१/नवि-३३ दिनांक ०५.१०.२०२४ अन्वये

सदर कामांसाठी दोन स्वतंत्र प्रस्ताव तयार करून शासनाकडेस सादर करण्याच्या सुचना महानगरपालिकेस दिलेल्या आहेत त्यानुसार महानगरपालिकेने महानगरपालिका पत्र क्रं.जमनपा/प्रकल्प विभाग/९६/२०२४ दि.०७.१०.२०२४ अन्वये तांत्रिक मान्यतेसाठी सुधारीत प्रस्ताव तयार करून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग नाशिक यांना सादर केला होता. महाराष्ट्र राज्य विज उत्पादक कंपनी लि. यांचे मार्फत करावयाच्या कामांच्या रू.१७२,६४,०९,६४५/- च्या प्रस्तावास मुख्य अभियंता, मजीप्रा वि. नाशिक यांचे तांत्रिक मान्यता पत्र क्रं.मजीप्रा/नाशिक/चिशा/२७६९/२०२४ दि.०८.१०.२०२४ अन्वये तांत्रिक मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार सदर सुधारीत झालेल्या कामांच्या प्रस्तावास राज्य स्तरीय तांत्रिक मान्यता समितीकडे दि.०८.१०.२०२४ रोजी सादर करण्यात आलेला आहे. सदर कामे महाराष्ट्र राज्य विज उत्पादक कंपनी लि. यांचेकडून केल्यास त्यांचा आकृतीबंध खालील प्रमाणे होणार आहे.

| **मलनिस्सारण झोन** | **एकुण अंदाजित खर्च** | **महाजेनको मार्फत करावयाच्या कामांसाठी येणारा खर्च** | महानगरपालिका हिस्सा ३० % |
|---|---|---|---|
| झोन क्रं.०२-खेडी नाला | रू.२५५.५० कोटी | रू.३३.०१ कोटी | रू.९.९० कोटी |
| झोन क्रं.०३-हरिविठठल नाला | रू.४१२.२९ कोटी | रू.११९.०३ कोटी | रू.३५.७१ कोटी |
| झोन क्रं.०५-पिंप्राळा नाला | रू.१८१.१३ कोटी | रू.२०.६१ कोटी | रू.६.१८ कोटी |
| | | रू.१७२.६५ कोटी | रू.५१.७९ कोटी |

सदर कामी महानगरपालिकेच्या उपरोक्त तीनही झोन मधील वरील प्रस्तावित बांधकामे महाराष्ट्र राज्य विज उत्पादक कंपनी लि. यांचेकडून केल्यास यात महानगरपालिकेच्या हिस्याची रक्कम रू.५१.७९ कोटी त्यांचेमार्फत उभारण्यात येणार असल्याने महाराष्ट्र राज्य विज उत्पादक कंपनी लि. सोबत करार करण्यास व त्यानुसार अमृत २.० अंतर्गत महाराष्ट्र राज्य विज उत्पादक कंपनी लि. कडून करावयाच्या कामांच्या रू.१७२,६४,०९,६४५/- खर्चास,

१) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे प्रकरण १२ नाल्या व जलनिःसारण मधील कलम १५४ नुसार सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळणेस,

२) सदर कामी केंद्र शासनाच्या निधिची रक्कम व राज्य शासनाच्या निधिची रक्कम वरील बांधकामांसाठी शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार महाराष्ट्र राज्य विज उत्पादक कंपनी लि. यांना देण्यास व बांधकामासाठी निश्चित केलेल्या जागांवर कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून बांधकामे करणेस मान्यता मिळणेस,

३) महानगरपालिका स्वनिधीची ३०% रू.५१.७९ कोटी रक्कम महाराष्ट्र राज्य विज उत्पादक कंपनी लि. यांनी उभारणेस, तसेच सदर कामे त्यांचेकडून महानगरपालिकेस अमृत २.० अतंर्गत असलेल्या अंमलबजावणीच्या सुचना यांचे तंतोतंत पालन करण्याच्या अटीवर करून घेणेस मान्यता मिळणेस,

वरील प्रमाणे ०१ ते ०३ चा प्रस्तावाच्या अनुषंगाने मान्यता मिळणेस व कामे पूर्ण झाल्यानंतर २० वर्षे कालावधीसाठी व्यवस्थापन व देखभाल दुरूस्ती करार करणेस मान्यता मिळण्यासाठी प्रकल्प अभियंता, प्रकल्प विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.२९** **(विशेष महासभा)**

**विषय क्र.:- ०७** **प्रशासक ठराव क्र :-२०३** **दिनांक :-११/१०/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. प्रकल्प अभियंता, प्रकल्प विभाग यांचेकडील प्रस्ताव जा.क्र./जमनपा/प्रकल्प/१०३/२०२४ दि.१०/१०/२०२४
३. प्रकल्प अभियंता, प्रकल्प विभाग यांचा दि.०९/१०/२०२४ चा अभिप्राय
४. शहर अभियंता यांचा दि.१०/१०/२०२४ चा अभिप्राय
५. मुख्य लेखाधिकारी यांचा दि.१०/१०/२०२४ चा अभिप्राय
६. मुख्य लेखापरिक्षक यांचा दि.१०/१०/२०२४ चा अभिप्राय
७. आयुक्त यांचा दि.१०/१०/२०२४ चा अभिप्राय

**विषय :-** जळगांव महानगरपालिकेच्या अमृत २.० योजने अंतर्गत प्रस्तावित मलनिस्सारण योजना, पाणी पुरवठा योजना प्रकल्प व महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत पाणी पुरवठा प्रकल्पाच्या कामांसाठी स्वनिधीची रक्कम शहरी पायाभूत विकास निधी (Urban infrasturucture development fund) मधून उभारणी करणे.

वाचा क्र.१ व प्रकल्प अभियंता, प्रकल्प विभाग, मनपा जळगांव यांचा वाचा क्र. २ ते ७ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जळगाव शहर महानगरपालिका क्षेत्रात अमृत २.० अभियाना अंतर्गत / महाराष्ट्र नगरोत्थान महाअभियाना अंतर्गत खालील प्रमाणे प्रस्ताव महानगरपालिकेने मान्यता दिलेली असून राज्यस्तरीय तांत्रिक समितीची मान्यता मिळालेली आहे / मान्यतेस्तव प्रस्तावित आहेत.

| **मलनिस्सारण झोन** | **एकुण अंदाजित खर्च** | महानगरपालिका हिस्सा ३० % |
|---|---|---|
| झोन क्रं.०२-खेडी नाला | रू.२५५.५० कोटी | रू. ७६.६५ कोटी |
| झोन क्रं.०३-हरिविठठल नाला | रू.४१२.२९ कोटी | रू.१२३.६८ कोटी |
| झोन क्रं.०५-पिंप्राळा नाला | रू.१८१.१३ कोटी | रू. ५४.३३ कोटी |
| एकुण | **रू.८४८.९२ कोटी** | रू. २५४.६६ कोटी |
| पाणी पुरवठा योजना अमृत २.० (मान्यता प्राप्त) | रू.१७९.४० कोटी | रू. ५३.८२ कोटी |
| पाणी पुरवठा योजना महाराष्ट्र नगरोत्थान महाअभियान | रू.१६६.८५ कोटी | रू. ५०.०५ कोटी |
| **एकुण** | **रू.३४६.२५ कोटी** | रू.१०३.८७ कोटी |

१. अमृत २.० व महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजने अंतर्गत “ड” वर्ग महानगरपालिकांसाठी एकुण प्रकल्प रकमेच्या ३०% रक्कम स्वहिस्याची उभारणी करणे आवश्यक आहे. वरील प्रमाणे प्रकल्प मान्यतेच्या अधीन असून एकुण मलनिस्सारण प्रकल्पांच्या उर्वरीत ०३ झोनची रू.८४८.९२ कोटी रकमेची कामे करण्यासाठी महानगरपालिकेस रू.२५४.६६ कोटी स्वहिस्याची रक्कम उभारणी करणे आवश्यक आहे. तसेच पाणी पुरवठा योजनांसाठी रू.३४६.२५ कोटी रकमेची कामे करण्यासाठी रू.१०३.८७ कोटी स्वहिस्याची रक्कम उभारणी करणे आवश्यक आहे. एकुण सर्व प्रकल्पांसाठी रू.३५८.५३ कोटी रक्कम उभारणी करणे आवश्यक आहे.

२. जळगांव शहर महानगरपालिका प्रशासक ठराव क्र. १३३ दि.१९.०७.२०२४ च्या ठरावानुसार जळगाव महानगरपालिका क्षेत्र हे भुसावळ औष्णीक विदयुत केंद्राच्या ५० कि.मी. परीघाच्या आत असल्याने नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई शासन निर्णय क्रं. संकीर्ण-२०१६/प्र.क्रं.२५९/नवि- ३३ दि.३०.११.२०१७ नुसार नागरी भागातील सांडपाणी

प्रक्रिया पुनर्चक्रीकरण व पुनर्वापर धोरणानुसार प्रक्रिया केलेले पाणी महाराष्ट्र राज्य विज उत्पादक कंपनी लि. यांना देण्याबाबत निश्चिती केलेली आहे. महाराष्ट्र राज्य विज उत्पादक कंपनी लि. यांनी कराराचा मसुदा महानगरपालिकेस सादर केलेला असून त्यात नमूद केले नुसार जळगाव शहरापासून ते भुसावळ औष्णीक विदयुत केंद्रापर्यन्त प्रक्रिया केलेले पाणी नेण्यासाठी, पुढील प्रक्रिया केंद्र उभारणेचा (Tertiary treatment plant) संपुर्ण खर्च महाराष्ट्र राज्य विज उत्पादक कंपनी करणार आहे या कामासाठी ०३ वर्षे कालावधी लागणार आहे. तसेच प्रकल्पाची कार्यान्विती लवकर होणेसाठी जळगाव महानगरपालिकेच्या प्रस्तावित मलनिस्सारण प्रकल्पांच्या ०३ ही झोन मधील नाल्यावर प्रस्तावित Wet well, pump house, Pumping Machinary, Electrical works, rising main व एकत्रित प्रस्तावित Sewerage treatment plant ६० दश लक्ष लिटर्स ही कामे त्यांचे मार्फत अंमलबजावणी यंत्रणा म्हणून करणेचा व त्यासाठी लागणारी ३०% महानगरपालिका हिस्याची रक्कम महाराष्ट्र राज्य विज उत्पादक कंपनी लि. मार्फत उभारणेचा प्रस्ताव दिलेला आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्य विज उत्पादक कंपनी लि. यांचे मार्फत करावयाच्या कामांच्या स्वतंत्र प्रस्ताव तयार करून मुख्य अभियंता, मजीप्रा वि. नाशिक यांचे तांत्रिक मान्यता पत्र क्रं.मजीप्रा/नाशिक/चिशा/२७६९/२०२४ दि.०८.१०.२०२४, मुख्य अभियंता, मजीप्रा वि. नाशिक यांचे तांत्रिक मान्यता पत्र क्रं.मजीप्रा/नाशिक/चिशा/२७६८/२०२४ दि.०८.१०.२०२४ व मुख्य अभियंता, मजीप्रा वि. नाशिक यांचे तांत्रिक मान्यता पत्र क्रं.मजीप्रा/नाशिक/चिशा/२७६७/२०२४ दि.०८.१०.२०२४ च्या तांत्रिक मान्यतेसह शासनास सादर केला आहे.

| **मलनिस्सारण प्रस्तावित कामे** | **एकुण अंदाजित खर्च** | महानगरपालिका हिस्सा ३० % | मनपास उभारावयाची स्वहिस्याची रक्कम |
|---|---|---|---|
| महाजेनको मार्फत कामे | रू.१७२.६५ कोटी | रू.५१.७९ कोटी | रू.० कोटी |
| झोन क्रं.०३-हरिविठ्ठल नाला | रू.२९३.२७ कोटी | रू.८७.९८ कोटी | रू.८७.९८ कोटी |
| झोन क्रं.०२-खेडी नाला व झोन क्रं.०५-पिंप्राळा नाला | रू.३८३.०७ कोटी | रू.११४.९२ कोटी | रू.११४.९२ कोटी |
| | रू.८४८.९९ कोटी | रू.२५४.६९ कोटी | रू.२०२.९० कोटी |

३. मलनिस्सारण योजेनेची प्रस्तावित कामांसाठी एकुण रू. ८४८.९९ कोटी खर्च अपेक्षित आहे यापैकी रू.१७२.६५ कोटी रकमेची कामे महाराष्ट्र राज्य विज उत्पादक कंपनी लि. यांनी केल्यास व त्यासाठी रू.५१.७९ कोटी खर्च महानगरपालिका स्वहिस्याच्या रकमेसाठी केल्यास महानगरपालिकेच्या स्वहिस्याच्या एकुण रू.२५४.६६ कोटी मधून रू.५१.७९ कोटी कमी होईल व रू.२०२.९० कोटी स्वहिस्सा उभारावा लागेल व नाल्यापासून पुढील कामे कमी कालावधीत पूर्ण होवून प्रक्रिया सुरू करता येईल.

| पाणी पुरवठा प्रस्तावित कामे | अंदाजित खर्च | **मनपा हिस्याची रक्कम** |
|---|---|---|
| पाणी पुरवठा योजना अमृत २.० | रू.१७९.४० | रू. ५३.८२ |
| पाणी पुरवठा योजना महाराष्ट्र नगरोत्थान महाअभियान | रू.१६६.८५ | रू. ५०.०५ |
| **एकुण** | **रू.३४६.२५** | रू.१०३.८७ |

महानगरपालिकेस सदरची कामे हाती घेण्यासाठी मलनिस्सारण प्रकल्पांसाठी रू. २०२.९० कोटी व पाणी पुरवठा प्रकल्पांसाठी रू.१०३.८७ कोटी स्वहिस्याच्या रकमेची उभारणी करावी लागेल.

५. सदर अभियानासाठी महानगरपालिका हिस्याची उभारणी शासन निर्णयातील अ.क्रं.९ नुसार " राज्य शासनाने तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांनी स्वहिस्याचा निधी उभारतांना म्युनिसिपल बॉंड, कर्ज, राज्य शासनाचे अनुदान, केंद्रीय वित्तीय आयोग अनुदान याचा वापर करावा. त्याचप्रमाणे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना अमृत २.० अभियाना अंतर्गत प्रकल्प किमतीपैकी स्वहिस्याची रक्कम वित्तीय संस्थांकडून कर्ज घेवून उभारता येईल व त्याकरीता आवश्यकतेनुसार शासनाची परवानगी घ्यावी " या निर्देशानुसार स्वहिस्याच्या रकमेचे नियोजन करणेस महासभा ठराव क्रं.८६९ दि.०८.०८.२०२२ नुसार मान्यता दिलेली आहे.

६.सदयस्थितीत शहरी पायाभूत विकास निधी (UIDF) Urban Infrastructure Development Fund निधीतून प्रस्ताव शासनाकडून मागविण्यात आलेले आहेत.

**<u>शहरी पायाभूत विकास निधी (UIDF) Urban Infrastructure Development Fund</u>**

- सदर योजने अंतर्गत पाणी पुरवठा व मलनिस्सारण प्रकल्पांसाठी कर्ज देण्यात येते.
- सदर योजने अंतर्गत प्रकल्पांची किंमत रु. १०० कोटीपेक्षा जास्त असल्यास ७५% कर्ज रक्कम मंजूर करण्यात येते.
- सदर कर्जासाठी व्याज दर हे ज्यावेळेस कर्ज देण्यात येईल त्यावेळेस प्रचलित असलेले व्याज दर वजा १.५० % आहेत, वेळेवर व्याजाच्या रकमा परतफेड न केल्यास त्यावर दंड व्याज आकारण्यात येणार आहे. सदर कर्जाची रकमेचर परतफेड ०५ वार्षिक हप्त्यांमधे विभागून कर्ज अदा केल्यापासून ०७ वर्षात करावयाची आहे, त्यात ०२ वर्षांचा Moratorium कालावधी समावेश असून पहील्या ०२ वर्षात फक्त व्याजाची रक्कम परतफेड करावयाची असून पुढील ०५ वर्षात व्याज व मुददल रकमेची वार्षिक एकरकमी परतफेड करावयाची आहे.

- UIDF अंतर्गत पाणी पुरवठा व मलनिस्सारण प्रकल्पांसाठी रू.३०६.७७ कोटी वित्त पुरवठा आवश्यक आहे. मात्र UIDF अंतर्गत १०० कोटींच्या वरील प्रकल्पांसाठी ७५ टक्के वित्त पुरवठा करण्यात येतो. त्यानुसार रू.३०६.७७ कोटीच्या ७५ टक्के रू.२३०.०७ कोटी वित्त पुरवठा होईल व उर्वरीत रू.७६.६९ कोटी महानगरपालिकेस स्वनिधीतून / उत्पन्नातून उभारावे लागतील.

तरी , मलनिस्सारण झोन क्रं.०३-हरिविठठल नाला, झोन क्रं.०२-खेडी नाला व झोन क्रं.०५-पिंप्राळा नाला, पाणी पुरवठा योजना अमृत २.०, पाणी पुरवठा योजना महाराष्ट्र नगरोत्थान महाअभियान ही कामे राबविण्यासाठी वरील प्रमाणे परीगणनेनुसार अनुज्ञेय असलेली कर्ज रक्कम रू. २३०.०७ कोटी कर्ज स्वरूपात शासनाच्या शहरी पायाभूत विकास निधी (Urban infrasturucture development fund) मधून शासनाच्या मान्यतेनुसार उपलब्ध करून घेणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १०९ नुसार तसेच प्रस्तावानुसार मान्यता देणेकामी महासभेची मान्यता घेणेकामी प्रकल्प विभाग, शहर अभियंता,मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परीक्षक यांची मा.आयुक्त सो यांचे समवेत संयुक्त बैठक झाली यात प्रकल्पांसाठी निधीची आवश्यकता विचारात घेता शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार विकल्पानुसार शहरी पायाभूत विकास योजने अंतर्गत प्रस्ताव सादर करून कर्ज उभारणी करण्याचे चर्चेअंती निश्चित करण्यात आले. सदर कर्जाच्या परतफेडीसाठी कर्जाची मुददल रक्कम, व्याज व महानगरपालिका हिस्याची रक्कम उभारणेसाठी महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीनुसार विविध करांतून मिळणाऱ्या उत्पन्नातून जास्तीत जास्त वसुली, करांत वाढ तसेच महानगरपालिकेची थकीत असलेली रक्कम वसुली करणे,गाळे भाडे थकबाकीसह तात्काळ वसुलीबाबत निर्णय होवून, महानगरपालिका करांच्या व भाडे वसुलीत वाढ होवून प्राप्त होणाऱ्या वार्षिक रकमेतून कर्जाने घेतलेलया रकमेच्या मुददल व व्याज परतफेड करता येवू शकेल तसेच वार्षीक अंदाजपत्रकांत सदर रकमेच्या परतफेडीसाठी तरतूद करावी लागेल. याप्रमाणे प्रस्तावास मान्यता मिळण्यासाठी प्रकल्प अभियंता, प्रकल्प विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ व ७ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-

(**ज्ञानेश्वर ढेरे**)

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.२९** **(विशेष महासभा)**

---

**विषय क्र.:- ०८** **प्रशासक ठराव क्र.:-२०४** **दिनांक :-११/१०/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. उपअभियंता, पाणी पुरवठा विभाग यांचेकडिल जा.क्रं./१७५/२०२४-२५ दि.०९/१०/२०२४
३. उपअभियंता, पाणी पुरवठा विभाग यांचा दि.१०/०९/२०२४ चा अभिप्राय
४. मुख्य लेखाधिकारी यांचा दि.०५/०९/२०२४ चा अभिप्राय
५. शहर अभियंता यांचा दि.१०/०९/२०२४ चा अभिप्राय
६. सहाय्यक आयुक्त यांचा दि.११/०९/२०२४ चा अभिप्राय
७. मुख्य लेखापरीक्षक यांचा दि.११/०९/२०२४ चा अभिप्राय
८. अतिरीक्त आयुक्त यांचा दि.१२/०९/२०२४ चा अभिप्राय

**विषय :-** वाघुर रॉ वॉटर केंद्र येथे विदयुत पंपींग येथील ग्राहक क्रं.११००१९००४४८० चे ग्राहकापोटी अतिरीक्त सुरक्षा अनामत (Additional Security Deposit) भरणे बाबत.

---

वाचा क्र.१ व उपअभियंता, पाणी पुरवठा विभाग यांचा वाचा क्र. २ ते ८ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

शहरास पाणी पुरवठा करणेकामी वाघुर रॉ वॉटर केंद्र येथे विदयुत पंप बसविले आहेत. सदर पंपाकरीता उच्चदाब विदयुत पुरवठा घेण्यांत आलेला असून त्याचा ग्राहक क्रं.११००१९००४४८० आहे. सदर ग्राहकापोटी अतिरीक्त सुरक्षा अनामत (Additional Security Deposit) रु.१,०३,४२,६००/- मात्र भरणेबाबत अधिक्षक अभियंता, मराविवि कं.मर्या., जळगांव कार्यालय यांचेकडील नोटीस दि.२०/०८/२०२४ रोजी प्राप्त झाली आहे. महावितरणचे नियमानुसार अतिरीक्त सुरक्षा अनामत रक्कम भरणे आवश्यक आहे. अतिरीक्त सुरक्षा अनामत ३० दिवसाचे आंत न भरल्यास सदरहु ठिकाणावरील विदयुत कनेक्शन कायमस्वरुपी खंडीत करणेत येईल असे नमुद केले आहे.

१५ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशी नुसार राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाकरीता प्राप्त अनुदानाच्या वितरण व विनियोगाबाबतची कार्यपध्दती निश्चीत करणेबाबत महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र./एफएफसी-२०२०/प्र.क्रं.५६/नवि-४ मंत्रालय, मुंबई दि.२८ ऑक्टोंबर २०२० अन्वये १५ व्या केंद्रीय वित्त आयोगातील निधीतून शासन निर्णय-II अंतर्गत ब मुलभुत अनुदान / अबंधनकारक अनुदाना अंतर्गत वाघुर रॉ वॉटर केंद्र येथील ग्राहक क्रं.११००१९००४४८० या ग्राहक क्रमांकावर अतिरीक्त सुरक्षा अनामत (Additional Security Deposit) रु.१,०३,४२,६००/- मात्र रक्कम शिल्लक असलेल्या १५ व्या वित्त आयोगातील अबंधनकारक अनुदानातून भरणा करणेस मान्यता मिळण्यासाठी उपअभियंता, पाणी पुरवठा विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ व ८ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.२९** **(विशेष महासभा)**

**विषय क्र.:- ०९** **प्रशासक ठराव क्र.:-२०५** **दिनांक :-११/१०/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचेकडिल जा.क्रं./बांधकाम/१३९६/२०२४-२५ दि.११/१०/२०२४

**विषय :-** जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजने अंतर्गत शहरातील विकास कामांना मान्यता देणे बाबत.

वाचा क्र.१ व शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचा वाचा क्र. २ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजने अंतर्गत सहाय्यक आयुक्त, न.वि.शाखा,जिल्हाधिकारी कार्यालय,जळगांव यांचे कडील पत्र क्रं.जा.क्रं./न.वि.शाखा/न.पा-१/६८८/२०२४ दि.०३/१०/२०२४ च्या पत्रानुसार महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजने अंतर्गत खाली नमुद कामांचे अंदाजपत्रक रक्कम रु.२२,०१,७५,९०२/- मात्रचे साबा विभाग राज्यदर सुची सन २०२३-२४ नुसार तयार करण्यात आलेले आहे. सदर अंदाजपत्रकास शहर अभियंता यांनी खालील कामांना तांत्रिक मान्यता प्रदान केलेली आहे.

त्यानुसार शहर अभियंता यांनी खालील०१ ते ७३ कामांच्या अंदाजपत्रकांना सन-२०२४-२५ या आर्थीक वर्षातील तरतूदी अंतर्गत मान्यता होण्याकरीता महासभेची मान्यता आवश्यक असल्याने महासभा/प्रशासक यांची मान्यता होवुन तातडीने प्रशासकीय ठराव होण्याकरीता प्रस्ताव सादर केलेला आहे.

| अ.क्रं. | कामाचे नांव | तांत्रिक मान्यता जशमनपा पत्र क्रं. व दिनांक | तांत्रिक मान्यता रक्कम |
|---|---|---|---|
| १. | प्रभाग क्र.०१ अंतर्गत एल ई डी पथदिवे बसविणे | TS/Elect/२० दि.०४/१०/२०२४ | ४९९९६६ |
| २. | प्रभाग क्र. ०२ अंतर्गत एल ई डी पथदिवे बसविणे | TS/Elect/२१ दि.०४/१०/२०२४ | ४९९५२७ |
| ३. | प्रभाग क्र.०३ अंतर्गत एल ई डी पथदिवे बसविणे | TS/Elect/२२ दि.०४/१०/२०२४ | ४९९१९५ |
| ४. | प्रभाग क्र.०४ अंतर्गत एल ई डी पथदिवे बसविणे | TS/Elect/२३ दि.०४/१०/२०२४ | ४९९७४७ |
| ५. | प्रभाग क्र.०५ अंतर्गत एल ई डी पथदिवे बसविणे | TS/Elect/२४ दि.०४/१०/२०२४ | ४९९७५६ |
| ६. | प्रभाग क्र.०६ अंतर्गत एल ई डी पथदिवे बसविणे | TS/Elect/२५ दि.०४/१०/२०२४ | ४९९४४१ |
| ७. | प्रभाग क्र.०७ अंतर्गत एल ई डी पथदिवे बसविणे | TS/Elect/२६ दि.०४/१०/२०२४ | ४९९६५१ |
| ८. | प्रभाग क्र.०८ अंतर्गत एल ई डी पथदिवे बसविणे | TS/Elect/२७ दि.०४/१०/२०२४ | ४९९८६१ |
| ९. | प्रभाग क्र.०९ अंतर्गत एल ई डी पथदिवे बसविणे | TS/Elect/२८ दि.०४/१०/२०२४ | ४९९७८८ |
| १०. | प्रभाग क्र.१० अंतर्गत एल ई डी पथदिवे बसविणे | TS/Elect/२९ दि.०४/१०/२०२४ | ४९९६५१ |
| ११. | प्रभाग क्र.११ अंतर्गत एल ई डी पथदिवे बसविणे | TS/Elect/३० दि.०४/१०/२०२४ | ४९९७५६ |
| १२. | प्रभाग क्र.१२ अंतर्गत एल ई डी पथदिवे बसविणे | TS/Elect/३१ दि.०४/१०/२०२४ | ४९९१९५ |
| १३. | प्रभाग क्र.१३ अंतर्गत एल ई डी पथदिवे बसविणे | TS/Elect/३२ दि.०४/१०/२०२४ | ४९९७८८ |
| १४. | प्रभाग क्र.१४ अंतर्गत एल ई डी पथदिवे बसविणे | TS/Elect/३३ दि.०४/१०/२०२४ | ४९९९६६ |
| १५. | प्रभाग क्र.१५ अंतर्गत एल ई डी पथदिवे बसविणे | TS/Elect/३४ दि.०४/१०/२०२४ | ४९९५२७ |
| १६. | प्रभाग क्र.१६ अंतर्गत एल ई डी पथदिवे बसविणे | TS/Elect/३५ दि.०४/१०/२०२४ | ४९९७४७ |
| १७. | प्रभाग क्र.१७ अंतर्गत एल ई डी पथदिवे बसविणे | TS/Elect/३६ दि.०४/१०/२०२४ | ४९९८६१ |
| १८. | प्रभाग क्र.१८ अंतर्गत एल ई डी पथदिवे बसविणे | TS/Elect/३७ दि.०४/१०/२०२४ | ४९९४४१ |

| | | | |
|---|---|---|---|
| १९. | प्रभाग क्र.१९ अंतर्गत एल ई डी पथदिवे बसविणे | TS/Elect/३८ दि.०४/१०/२०२४ | ४९९८६१ |
| २०. | प्रभाग क्र.०७ अंतर्गत गणेश डिव्हाईन बिल्डींग पासून ते अथर्व अपार्टमेंट पर्यंत रस्ता तयार करणे | TS/PWD/२१० दि.०७/१०/२०२४ | ४९९९४६० |
| २१. | प्रभाग क्र.०७ अंतर्गत गणेश अथर्व अपार्टमेंन्ट पासून अथर्व कॉलनी पर्यंत रस्ता तयार करणे | TS/PWD/२०८ दि.०७/१०/२०२४ | ४९९९६३६ |
| २२. | प्रभाग क्र.०७ अंतर्गत पंडितराव कॉलनी, हनुमान मंदिर ते खर्चे प्रोव्हिजन पर्यंत रस्ता तयार करणे | TS/PWD/२१७ दि.०७/१०/२०२४ | ४९९९४६० |
| २३. | प्रभाग क्र.०७ अंतर्गत वर्धमान हाईट पासुन ते गजानन महाराज मंदिर रस्त्या पर्यंत रस्ता तयार करणे | TS/PWD/२१६ दि.०७/१०/२०२४ | ४९९९५६९ |
| २४. | प्रभाग क्र.०७ अंतर्गत गणेश कॉलनी चौक पासुन ते भगीरथ कॉलनीकडे जाणारा रस्ता तयार करणे | TS/PWD/२१२ दि.०७/१०/२०२४ | ४९९९२८५ |
| २५. | प्रभाग क्र.०७ अंतर्गत पिंप्राळा गट नं.८५ प्लॉट नं.३० ते गट नं.८६/२ प्लॉट नं.४ पर्यंत रस्ता तयार करणे | TS/PWD/२१८ दि.०७/१०/२०२४ | ४३९९७८९ |
| २६. | प्रभाग क्र.०७ अंतर्गत पिंप्राळा गट नं.८५ प्लॉट नं.३० ते प्लॉट नं.१२ पर्यंत रस्ता तयार करणे | TS/PWD/२०६ दि.०७/१०/२०२४ | १९९९२९८ |
| २७. | प्रभाग क्र.०७ अंतर्गत पिंप्राळा गट नं.८६/०२ प्लॉट नं.१० ते गट नं.८५ प्लॉट नं.२१ पर्यंत रस्ता तयार करणे | TS/PWD/२१३ दि.०७/१०/२०२४ | १३९९२१७ |
| २८. | प्रभाग क्र.०७ अंतर्गत पिंप्राळा गट नं.८६/०१ प्लॉट नं.१९ ते गट नं.८३ प्लॉट नं.०६ पर्यंत रस्ता तयार करणे | TS/PWD/२२१ दि.०७/१०/२०२४ | ४९९९६३६ |
| २९. | प्रभाग क्र.०७ अंतर्गत पिंप्राळा गट नं.८६/०२ प्लॉट नं.१६ ते गट नं.८६/०१ प्लॉट नरं.०३ पर्यंत रस्ता | TS/PWD/२११ दि.०७/१०/२०२४ | १७९९४५२ |
| ३०. | प्रभाग क्र.०७ अंतर्गत पिंप्राळा गट नं.८६/०१ प्लॉट नं.२० ते प्लॉट नं.२९ पर्यंत रस्ता तयार करणे | TS/PWD/२१५ दि.०७/१०/२०२४ | २१९९८९४ |
| ३१. | प्रभाग क्र.०७ अंतर्गत आशाबाबा नगर येथील गोकर्ण महादेव मंदिर परिसरातील रस्ते तयार करणे | TS/PWD/२१९ दि.०७/१०/२०२४ | ४९९९७३७ |
| ३२. | प्रभाग क्र.०७ अंतर्गत दिनानाथवाडी व संगम सोसायटी परीसरातील रस्ते तयार करणे | TS/PWD/२०९ दि.०७/१०/२०२४ | ४९९९८९२ |
| ३३. | प्रभाग क्र.०७ अंतर्गत भगीरथ कॉलनी परिसरातील रस्ते तयार करणे | TS/PWD/२०५ दि.०७/१०/२०२४ | ४९९९२८५ |
| ३४. | प्रभाग क्र.०७ अंतर्गत एच डी एफ सी एटी एम पासुन साई आनंद अपार्टमेंन्ट पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे | TS/PWD/२२० दि.०७/१०/२०२४ | ३९९८५०० |
| ३५. | प्रभाग क्र.०७ अंतर्गत साई आनंद अपार्टमेंन्ट पासुन रेल्वे लाईन पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे | TS/PWD/२२४ दि.०७/१०/२०२४ | ३९९८५०० |
| ३६. | प्रभाग क्र.०३ अंतर्गत काशिनाथ नगर येथील जगन्नाथ रामदास पाटील ते अनिकेत राजेंद्र पाटील यांच्या घरापर्यंत रस्ता तयार करणे | TS/PWD/२२८ दि.०७/१०/२०२४ | ४९९८८१८ |
| ३७. | प्रभाग क्र.०३ अंतर्गत गट नं.०३ ज्ञानेश्वर नगर परिसरातील रस्ते तयार करणे | TS/PWD/२२९ दि.०७/१०/२०२४ | ४९९८८१८ |
| ३८. | प्रभाग क्र.०३ अंतर्गत गट नं.५/१,५/२ समर्थ नगर खेडी येथी रस्ते तयार करणे | TS/PWD/२३२ दि.०७/१०/२०२४ | ४९९८८१८ |
| ३९. | प्रभाग क्र.०३ अंतर्गत गट नं.०८ संभाजी नगर खेडी शिवार येथील रस्ते तयार करणे | TS/PWD/२३३ दि.०७/१०/२०२४ | ४९९८८१८ |
| ४०. | प्रभाग क्र.०३ अंतर्गत श्रावण नगर येथील अनिकेत राजेंद्र पाटील यांच्या घरापासुन ते सुंदर नगर ओपनस्पेस पर्यंत रस्ता तयार करणे | TS/PWD/२२६ दि.०७/१०/२०२४ | ४९९५२५९ |
| ४१. | प्रभाग क्र.०३ अंतर्गत सुंदर नगर ओपनस्पेस पासून ते विवेक चौधरी यांच्या घरापर्यंत रस्ता तयार करणे | TS/PWD/२२७ दि.०७/१०/२०२४ | ४९९७०४८ |
| ४२. | प्रभाग क्र.०३ अंतर्गत सुंदर नगर येथील विवेक चौधरी यांच्या घरापासुन राजेश पाटील माधव नगर पर्यंत रस्ता तयार करणे | TS/PWD/२३६ दि.०७/१०/२०२४ | ४९९५२५९ |
| ४३. | प्रभाग क्र.०३ अंतर्गत ज्ञानदेव नगर येथील समृध्दी सागर अपार्टमेंन्ट पासुन ते जगन्नाथ कोळी यांच्या घरासमोरील सुनंदिनी पार्क कडे जाणारा रस्ता तयार करणे | TS/PWD/२३७ दि.०७/१०/२०२४ | ४९९८८१८ |
| ४४. | प्रभाग क्र.०३ अंतर्गत धनश्री मेडिकल पासुन ते मनुदेवी गिरणी समोरील रस्ता सुनंदिनी पर्यंत तयार करणे | TS/PWD/२३० दि.०७/१०/२०२४ | ३९९८८८२ |
| ४५. | प्रभाग क्र.०३ अंतर्गत सुनंदिनी पार्क येथील श्री विधाते यांच्या घरासमोरील रस्ता तयार करणे | TS/PWD/२४० दि.०७/१०/२०२४ | २४९८६३८ |

| | | | |
|---|---|---|---|
| ४६. | प्रभाग क्र.०३ अंतर्गत सुनंदिनी पार्क येथील उमापती महादेव मंदिर परीसरातील रस्ते तयार करणे | TS/PWD/२४२ दि.०७/१०/२०२४ | २४९८६३८ |
| ४७. | प्रभाग क्र.०३ अंतर्गत गट नं.१० विनायक नगर खेडी परिसरातील येथील रस्ते तयार करणे | TS/PWD/२३५ दि.०७/१०/२०२४ | ४९९८८१८ |
| ४८. | प्रभाग क्र.०३ अंतर्गत गट नं.७०/१/२/३ सागर नगर परिसरातील रस्ते तयार करणे | TS/PWD/२३१ दि.०७/१०/२०२४ | ४९९८००० |
| ४९. | प्रभाग क्र.०३ अंतर्गत काशिनाथ नगर येथील बोर्ड पासुन ते जगन्नाथ रामदास पाटील यांच्या घरापर्यंत रस्ता तयार करणे | TS/PWD/२३४ दि.०७/१०/२०२४ | ४९९५२५९ |
| ५०. | प्रभाग क्र.०६ अंतर्गत सरस्वती नगर येथील यशवंतराव मुक्तांगण हॉल समोरील रस्ता तयार करणे | TS/PWD/१९५ दि.०७/१०/२०२४ | ४९९९९५७ |
| ५१. | प्रभाग क्र.०६ अंतर्गत एम एम आहुजा यांच्या घरापासुन ते प्रकाश हॉस्पिटल पर्यंत रस्ता तयार करणे | TS/PWD/१९६ दि.०७/१०/२०२४ | ४९९९८३९ |
| ५२. | प्रभाग क्र.०६ अंतर्गत शरद महाजन यांच्या घरापासुन ते सजनी व्युटीक पर्यंत रस्ता तयार करणे | TS/PWD/१९७ दि.०७/१०/२०२४ | १७४९६४५ |
| ५३. | प्रभाग क्र.०८ अंतर्गत गिरनाई कॉलनी येथील परिसरातील रस्ते तयार करणे | TS/PWD/२२५ दि.०७/१०/२०२४ | ४४९९०८४ |
| ५४. | प्रभाग क्र.०८ अंतर्गत चंदुअण्णा नगर येथील संजय बडगुजर यांच्या घरापासुन ते साईभक्ती अपार्टमेंन्ट पर्यंत व चंदुअण्णा गेट पासुन ते हनुमान मंदिर पर्यंत व मनोज सोनवणे यांच्या घरापासुन पुढे रस्ते तयार करणे | TS/PWD/२०७ दि.०७/१०/२०२४ | ४९९९४६० |
| ५५. | प्रभाग क्र.०८ अंतर्गत हरीशंकर नगर येथील राहुल लोखंडे यांच्या घरापासुन ते स्वाती बडगुजर यांच्या घरापर्यंत रस्ता तयार करणे | TS/PWD/२२३ दि.०७/१०/२०२४ | ९९९५७१ |
| ५६. | प्रभाग क्र.०८ अंतर्गत शिवधाम मंदिर परिसरातील अमोल चव्हाण ते कमलेश पवार यांच्या घरापर्यंत रस्ता तयार करणे | TS/PWD/२१४ दि.०७/१०/२०२४ | ४९९९९२७ |
| ५७. | प्रभाग क्र.०८ अंतर्गत हरीशंकर नगर येथील रामाकांत शिरसाठ यांच्या घरापासुन ते चंद्रकांत कासार यांच्या घरापर्यंत रस्ता तयार करणे | TS/PWD/२२२ दि.०७/१०/२०२४ | २४९९२५३ |
| ५८. | प्रभाग क्र.१७ अंतर्गत सिध्दिविनायक शाळा परिसरातील अक्षय जेजुरकर रहत असलेल्या गल्लीतील रस्ता व चेतन कोळी राहत असलेली गल्ली व रुबी गल्लीतील रस्ता तयार करणे | TS/PWD/१९८ दि.०७/१०/२०२४ | २९९९९०८ |
| ५९. | प्रभाग क्र.१७ अंतर्गत अयोध्या नगर येथील भैरव भंगाळे यांच्या घरापासुन नाल्यापर्यंत रस्ता तयार करणे | TS/PWD/१९९ दि.०७/१०/२०२४ | ४९९९१३१ |
| ६०. | प्रभाग क्र.१७ अंतर्गत सिधिविनायक शाळा पासुन ते रुबी बिल्डींग पर्यंत रस्ता तयार करणे | TS/PWD/२०० दि.०७/१०/२०२४ | ४९९९१३१ |
| ६१. | प्रभाग क्र.०१ अंतर्गत गट नं.३७० के सी पार्क येथील नयना टेमकर यांच्या घरासमोरील रस्ता तयार करणे | TS/PWD/२४९ दि.०७/१०/२०२४ | २९९८७०८ |
| ६२. | प्रभाग क्र.०१ अंतर्गत गट नं.३७० के सी पार्क येथील नयना टेमकर यांच्या घरामागील रस्ता तयार करणे | TS/PWD/२५० दि.०७/१०/२०२४ | २९९८७०८ |
| ६३. | प्रभाग क्र.०२ अंतर्गत बारसे कॉलनी येथील रस्ते तयार करणे | TS/PWD/२४८ दि.०७/१०/२०२४ | ४९९७८८६ |
| ६४. | प्रभाग क्र.०५ भवानी पेठ येथील अंबाजी मेटल्सच्या डाव्या बाजूकडील व उजव्या बाजुकडील रस्ता शेवट पर्यंत तयार करणे | TS/PWD/२४१ दि.०७/१०/२०२४ | १४९९९७८ |
| ६५. | प्रभाग क्र.०५ अंतर्गत अशोक सिनेमा समोरील रस्ता तयार करणे | TS/PWD/२३९ दि.०७/१०/२०२४ | १९९८१८९ |
| ६६. | प्रभाग क्र.०५ अंतर्गत तिजोरी गल्ली येथील रस्ता तयार करणे | TS/PWD/२३८ दि.०७/१०/२०२४ | २४९९०९३ |
| ६७. | प्रभाग क्र.०९ अंतर्गत मानराज पार्क येथील ॲक्सीस बँकेपासून ते पिंप्राळा रस्त्यापर्यंत रस्ता तयार करणे | TS/PWD/२५१ दि.०७/१०/२०२४ | ४९९३५०९ |
| ६८. | प्रभाग क्र.१० अंतर्गत खंडेराव नगर साईबाबा मंदिर पासुन ते कापूसवाला पिंजारी यांच्या घरापर्यंत रस्ता करणे | TS/PWD/२५२ दि.०७/१०/२०२४ | ४१९२०८९ |
| ६९. | प्रभाग क्र.१३ अंतर्गत नित्यानंद मोठया पाण्याच्या टॉकी समोरील रस्ता कॉंक्रिटीकरण करणे (सर्व्हे नं.४५१) | TS/PWD/२४३ दि.०७/१०/२०२४ | २९९९२४७ |
| ७०. | प्रभाग क्र.१३ अंतर्गत गट नं.४१५/०१ क नेहरु नगर दगडीचाळ राजूभाऊ मिस्तरी यांच्या घरापासुन ते पंकज पानगळे घरापर्यंत रस्ता तयार करणे | TS/PWD/२४४ दि.०७/१०/२०२४ | १९९९९९२ |
| ७१. | प्रभाग क्र.१३ अंतर्गत मोहन नगर येथील बाविस्कर यांच्या ते सुतार डॉ. यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | TS/PWD/२४५ दि.०७/१०/२०२४ | ४९९९६११ |

| | | | |
|---|---|---|---|
| ७२. | प्रभाग क्र.१३ अंतर्गत रायसोनी नगर येथील मनीषा टेलर ते नितीन महाजन घरापर्यंत व नितीन महाजन ते प्लॉट नं.२० पर्यंत रस्ता तयार करणे. | TS/PWD/२४६ दि.०७/१०/२०२४ | १९९९७८९ |
| ७३. | प्रभाग क्र.१३ अंतर्गत रायसोनी नगर येथील शिवतीर्थ अपार्टमेंटला लागुन गटार तयार करणे. | TS/PWD/२४७ दि.०७/१०/२०२४ | ९९९९७१ |
| | | एकुण रक्कम रु. | २२०१७५९०२/- |

वरील कामास प्रशासकीय मान्यतेची आवश्यकता असल्याने प्रशासकीय मान्यता मिळण्याकरीता व तसा ठराव प्राप्त झाल्यानंतर मा.जिल्हाधिकारी,जळगांव यांचे कडेस वरील कामांचा प्रस्ताव सादर करणेस मान्यता मिळण्यासाठी शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ व २ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**